संं.फौ.ख. क्रमांक.४७९/२०२४

सरकार विरुध्द शरद

**निशाणी क्रमांक – १६**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.०१</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की –

माझे नांव – विशाल उत्तमराव कसबे,

वय – २५ वर्षे, धंदा – शिक्षण,

रा.खंडाळी, ता. अहमदपूर, लातूर.

**<u>शपथेवर सरतपास अभियोग पक्षातर्फे श्री.एन. ए. भांगे यांच्यामार्फत</u>**

**०१.** मी आरोपीस ओळखतो. आरोपी न्यायालयात हजर आहे. मी फिर्यादीस ओळखत नही. पोलीसांनी मला जप्ती पंचनाम्यासाठी बोलवले नव्हते. आता मला जप्ती पंचनामा दाखवण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर मला माहीत नाही. सहीस **निशाणी क्र.१७** देण्यात येते.

**<u>साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करत नसल्यामुळे अभियोग पक्षाच्या विनंतीवरुन फौ.प्र.संहितेवरुन कलम १५४ अन्वये सुचक प्रश्न विचारण्यास परवानगी देण्यात आली.</u>**

**०२.** हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी मला दि.०३/१०/२०२४ रोजी पोलीसांनी मला खंडाळी येथील प्रवीण लंच होममध्ये पंचनाम्यकामी बोलवले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी माझ्यासोबत सौरभ लामतुरे हे होते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्यासमक्ष पोलीसांनी आरोपीच्या ताब्यातून एका पांढऱ्या पोत्यातून भिंगरी संत्रा कंपनीच्या १८० मिली मापाच्या ४७ बाटल्या जप्त केल्या. हे म्हणणे खरे नाही की, त्यातील एक बाटली रासायनीक तपासणीसाठी राखून ठेवली. हे म्हणणे खरे नाही की, पंचनामा वाचून दाखवून आमच्या सह्या घेतलेल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी माझ्या ओळखीचा असल्याने त्याला शिक्षा होऊ नये म्हणून मी खोटी साक्ष

देत आहे.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.आर. व्ही. गायकवाड.</u>**

**०३.** नाकारला.

फेर तपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,                                   माझे समक्ष,

Digitally signed by WADGAONKAR SWANANDI DEVIDAS
Date: 2026.01.09 16:44:20 +0530

**(स्वानंदी दे. वडगांवकर)**

दिनांक –०९.०१.२०२५                                   न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अहमदपूर.

प्र.व.न्या.दं.